# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेवर महानगर क्षेत्राच्या परिक्षेत्रात मोफत प्राथमिक शिक्षण
**{शिक्षण विभाग}** देण्याची जबाबदारी आहे. शिक्षण हक्क कायदयानुसार प्रत्येक मुलांस तो कोणत्याही जाती, धर्म, पंथ परिस्थितीचा असला तरी शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. Autisum नी ग्रस्त विद्यार्थी शिक्षणापासून दुर्लक्षित राहतात. यामुळे अशा विद्यार्थ्यांना देखील शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे त्यांच्या कौशल्य क्षमतांचा विकास करणे याकरिता कार्यरत संवेदना स्वंमग्न मुलांच्या शाळेस महानगरपालिकेच्या कमी पटसंख्या असलेल्या धरमपेठ मनपा हिंदी प्राथ. शाळेतील वरच्या माळयावरील ७ वर्गखोल्या रू. ५०० प्रतिमाह प्रती वर्गखोली याप्रमाणे प्रथम ५ वर्षाकरीता खालील अटी व शर्ती अन्वये देणे संयुक्तीक राहील.

१) संस्थेस प्रती वर्ग खोली प्रती माह र. ५००/- या दराप्रमाणे वर्गखोली किरायाने देण्यात येईल.
२) संस्थेस प्रत्येकी ११ महिन्याचा भाडे करार महानगरपालिके सोबत करावा लागेल.
३) भाडे तत्वाने दिलेल्या कराराची मुदत प्रथमता ५ वर्षाची असून या कालावधीत महानगरपालिकेस स्व प्रयोजनार्थ इमारत वापरावयाची असल्यास, मनपाच्या/शासकीय प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून दयावयाची असल्यास संस्थेस विना अट, विना विलंब इमारत रिक्त करून दयावी लागेल.
४) प्रथमता निश्चित केलेल्या ५ वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संस्थेच्या कार्याच्या आधारे व मनपाच्या आवश्यकेनुसार पुढील मुदतवाढ देता येवू शकेल.
५) संस्थेस कमी दरात किरायाने वर्गखोल्या देत असताना संस्थेस त्यांचे शाळेमध्ये महानगपालिका नागपूरद्वारा नामनिर्देशित (Referred) किंवा नागपूर मनपाच्या शाळेत शिकणाऱ्या Autisum ग्रस्त मुलांना शाळेच्या एकूण क्षमतेच्या १०% इतक्या क्षमतेत निशुल्क प्रवेश व मासिक फी सुट (सद्यास्थितीत प्रतीमाह प्रती विद्यार्थी रू. ५०००/-) घेण्यात यावे. जसे ३० विद्यार्थी क्षमता असेल तर ३ विद्यार्थी मनपा नागपूर द्वारा Referred किंवा मनपा शाळेत शिकणारा असेल त्यांचेकडून मासिक शुल्क रू. ५०००/- घेण्यात येणार नाही.
६) संस्थेस त्यांचे वापरात असलेल्या विद्युत, पाणी व इतर लागू असलेल्या शासकीय करांचा भरणा स्वत: करावा लागेल.
७) करारनाम्यात नमूद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
८) एका ठराविक कालावधीनंतर जसे दोन किंवा तीन वर्षांनी महानगरपालिकेस भाडे पूर्ण मुल्याकंन करण्याचा अधिकार राहील.

सबब Autisum ग्रस्त विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या संवेदना स्वंमग्न मुलांच्या शाळेस विशेष बाब म्हणून ज्याप्रमाणे रात्र शाळांना रू. ५०० ते ६०० प्रती माह प्रती वर्ग खोली भाडे आकारणी केली जाते. त्याचप्रकारे या शाळेस देखील रू. ५०० प्रती वर्गखोली प्रती माह या दराप्रमाणे ७ वर्गखोल्या उपरोक्त नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून किरायाने देण्यास्तव मान्यतेस्तव सादर प्रस्तूत.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 330/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 27/03/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेवर महानगर क्षेत्राच्या परिक्षेत्रात मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी आहे. शिक्षण

हक्क कायदयानुसार प्रत्येक मुलांस तो कोणत्याही जाती, धर्म, पंथ परिस्थितीचा असला तरी शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. Autisum नी ग्रस्त विद्यार्थी शिक्षणापासून दुर्लक्षित राहतात. यामुळे अशा विद्यार्थ्यांना देखील शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे त्यांच्या कौशल्य क्षमतांचा विकास करणे याकरिता कार्यरत संवेदना स्वंमग्न मुलांच्या शाळेस महानगरपालिकेच्या कमी पटसंख्या असलेल्या धरमपेठ मनपा हिंदी प्राथ. शाळेतील वरच्या माळयावरील ७ वर्गखोल्या रू. ५०० प्रतिमाह प्रती वर्गखोली याप्रमाणे प्रथम ५ वर्षाकरीता खालील अटी व शर्ती अन्वये देणे संयुक्तीक राहील.

१) संस्थेस प्रती वर्ग खोली प्रती माह र. ५००/- या दराप्रमाणे वर्गखोली किरायाने देण्यात येईल.
२) संस्थेस प्रत्येकी ११ महिन्याचा भाडे करार महानगरपालिके सोबत करावा लागेल.
३) भाडे तत्वाने दिलेल्या कराराची मुदत प्रथमता ५ वर्षाची असून या कालावधीत महानगरपालिकेस स्व प्रयोजनार्थ इमारत वापरावयाची असल्यास, मनपाच्या/शासकीय प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून दयावयाची असल्यास संस्थेस विना अट, विना विलंब इमारत रिक्त करून दयावी लागेल.
४) प्रथमता निश्चित केलेल्या ५ वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संस्थेच्या कार्याच्या आधारे व मनपाच्या आवश्यकेनुसार पुढील मुदतवाढ देता येवू शकेल.
५) संस्थेस कमी दरात किरायाने वर्गखोल्या देत असताना संस्थेस त्यांचे शाळेमध्ये महानगपालिका नागपूरद्वारा नामनिर्देशित (Referred) किंवा नागपूर मनपाच्या शाळेत शिकणाऱ्या Autisum ग्रस्त मुलांना शाळेच्या एकूण क्षमतेच्या १०% इतक्या क्षमतेत निशुल्क प्रवेश व मासिक फी सुट (सद्यास्थितीत प्रतीमाह प्रती विद्यार्थी रू. ५०००/-) घेण्यात यावे. जसे ३० विद्यार्थी क्षमता असेल तर ३ विद्यार्थी मनपा नागपूर द्वारा Referred किंवा मनपा शाळेत शिकणारा असेल त्यांचेकडून मासिक शुल्क रू. ५०००/- घेण्यात येणार नाही.
६) संस्थेस त्यांचे वापरात असलेल्या विद्युत, पाणी व इतर लागू असलेल्या शासकीय करांचा भरणा स्वत: करावा लागेल.
७) करारनाम्यात नमूद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.
८) एका ठराविक कालावधीनंतर जसे दोन किंवा तीन वर्षांनी महानगरपालिकेस भाडे पूर्ण मुल्यांकन करण्याचा अधिकार राहील.

सबब Autisum ग्रस्त विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या संवेदना स्वंमग्न मुलांच्या शाळेस विशेष बाब म्हणून ज्याप्रमाणे रात्र शाळांना रू. ५०० ते ६०० प्रती माह प्रती वर्ग खोली भाडे आकारणी केली जाते. त्याचप्रकारे या शाळेस देखील रू. ५०० प्रती वर्गखोली प्रती माह या दराप्रमाणे ७ वर्गखोल्या उपरोक्त नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून किरायाने देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**